# "अण्णा भाऊ साठे यांचे कथावाङ्मय : मानवतावादी आकलन"

प्रा.डॉ. प्रकाश अर्जुन भामरे
जी.टी. पाटील महाविद्यालय,
नंदुरबार ता.जि. नंदुरबार

---

मार्क्सवाद आणि आंबेडकरवाद ही जीवनदर्शने मानवतावादाचा पुरस्कार करणारी जीवनदर्शने होत. अण्णा भाऊंच्या कथात्म साहित्यावर या दोन्ही जीवनदर्शनांचा प्रभाव आहे. ही दोन्ही तत्त्वज्ञाने माणसाला माणसाप्रमाणे जगता यावे यासाठी झटताना दिसतात. कार्ल मार्क्स आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोन्ही महामानवांना 'माणूस' सुखी झाला पाहिजे; त्याच्या मानवी प्रतिष्ठेला कुठेही धक्का लागणार नाही असे सतत वाटत होते. मानवतावादाच्या प्रस्थापनेसाठी त्यांनी संपूर्ण हयात वेचली. अण्णा भाऊ साठे यांच्या कथात्म साहित्यातून या दोन्ही विचारधारा प्रभावीपणे प्रतिबिंबित झालेल्या आढळतात. या दोन्ही विचारधारा जागतिक म्हणजे वैश्विक कल्याण चिंतणाऱ्या विचारधारा आहेत. 'माणूस जगला पाहिजे' ही कार्ल मार्क्सची मानवतावादी भूमिका होती. आर्थिक विषमतेमुळे 'माणूस' सातत्यने विटंबित होत आलेला आहे, असे मार्क्सला वाटत होते. मार्क्सने आर्थिक विषमतेविरुद्ध लढा पुकारला होता; तर डॉ. आंबेडकरांनी सामाजिक विषमतेविरुद्ध बंड पुकारले होते.

आर्थिक विषमतेमुळे मानवाच्या वाट्याला दुःखभोग आले, असे मार्क्सला वाटत होते. तर सामाजिक विषमता हेच सर्व मानवी दुःखांचे मूळ आहे असे डॉ. आंबेडकरांना वाटत होते. म्हणून या विचारवंतांनी आर्थिक व सामाजिक समतेसाठी संपूर्ण हयात वेचली. "ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरली नसून; ती दलितांच्या म्हणजेच श्रमिकांच्या तळहातावर तरलेली आहे" या अण्णा भाऊंच्या अवतरणातून मानवाच्या सुखासाठी श्रमिकांचे कठोर कष्टच कारणीभूत आहेत, असे सूचित होते. तर "जग बदल घालुनी घाव। सांगून गेले मला भिमराव।" या काव्यपंक्तीतून ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मानवतावादी विचारांचा पुरस्कार करतात. अण्णा भाऊंच्या कथात्म साहित्यातील सर्व व्यक्तिरेखा मार्क्सवाद, आंबेडकरवाद म्हणजेच मानवतावाद यांनी भारलेल्या आढळतात. अण्णा भाऊंच्या कथा-कादंबऱ्यांच्या निर्मितीमागे व्यापक मानवतावादी प्रेरणा होती. जो लेखक जनतेची कदर करतो; त्याची कदर जनता करते. देश सुखी व्हावा समृद्ध व्हावा, सभ्य व्हावा अशी मंगल स्वप्ने पाहत मी लिहीत असतो. अशी आपल्या लेखनामागची प्रामाणिक भूमिका अण्णा भाऊ स्पष्ट करतात.

अण्णा भाऊ साठे सुरुवातीच्या काळात शाहीर म्हणून प्रसिद्ध होते. अण्णा भाऊ साठे, अमर शेख, गव्हाणकर यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत आपल्या शाहिरीच्या माध्यमातून वणवा

पेटविला. पुढे त्यांनी कथा-कादंबरीकार म्हणून एक वेगळी ओळख निर्माण केली. त्यांच्या साहित्याने तळागाळांतील वंचितांचे दुःख, वेदना मुखर केली. मुंबईच्या बकाल वस्त्यांमध्ये ते राहिले "जे जीवन जगलो, जे अनुभवले, पाहिले, तेच मी आता लिहीत आहे. मला कल्पनेचे पंख लावून भरारी मारता येत नाही." असे अण्णा भाऊ सांगतात. आपल्या माणसांच्या जगण्याचा भरीव आशय पाठीशी ठेवून त्यांनी आपले कथात्म साहित्य निर्माण केले. अण्णा भाऊंनी निर्मिलेली साहित्यसंपदा विपुल आहे. पोवाडे, लावण्या, नाटके, लोकनाट्ये, प्रवासवर्णन, कथा, कादंबऱ्या इ. वाङ्मयप्रकार त्यांनी आपल्या प्रतिभेच्या सामर्थ्याने सहजपणे हाताळले. त्यांचे संपूर्ण साहित्य मानवतावादाने ओतप्रोत भरलेले आहे. त्यांचा एकूण साहित्याचा केंद्रबिंदू 'माणूस' हाच आहे. म्हणून त्यांना 'दलित कथेचे शिल्पकार' मानले जाते.

थोर साहित्यिक प्र.के. अत्रे अण्णा भाऊंच्या कथांविषयी लिहितात, "त्या जगण्यासाठी लढणाऱ्या माणसांच्या कथा आहेत. आपल्या कथांमध्ये त्यांनी निरनिराळी माणसे रंगविली आहेत. पण सर्वांच्या रक्तातून एकच लढाऊ ईर्षा वाहत आहे. त्या सर्वांना मानाने जगायचे आहे." अण्णा भाऊंनी मराठी कथेला विद्रोही, बंडखोर नायक दिला. या देशातील शोषितांना, पीडितांना, वंचितांना त्यांनी घाव घालून जग बदलायला निघालेला वीरनायक केले. सावकार, जमीनदार, इनामदार हे गरीबांचे शत्रू आहेत. नवा माणूस निर्माण करण्यासाठी या शत्रूंचे निर्दालन होणे आवश्यक आहे. अशा भूमिकेतून त्यांनी कथा लिहिल्या. माणसाच्या वाट्याला माणसाचे 'जगणे' आले पाहिजे, यासाठी त्यांची सर्व पात्रे झगडताना दिसतात. हा झगडा मानवतेच्या, माणसाच्या शत्रूंविरुद्धचा झगडा आहे. कुठल्याही स्तरावर 'मानवता' विटंबित होऊ नये; असे अण्णा भाऊंना प्रामाणिकपणे वाटते. मानवतेच्या विटंबनेच्या विरोधात त्यांचे नायक बंड करताना आढळतात. 'अन्याय करणाऱ्यांपेक्षा अन्याय सहन करणारे जास्त दोषी असतात.' या डॉ. आंबेडकरांच्या म्हणण्याप्रमाणे अण्णा भाऊंचे नायक अन्यायाविरुद्ध पेटून उठतात.

अण्णा भाऊंनी विपुल साहित्यनिर्मिती केली आहे. त्यात स्तालिनग्राडचा पोवाडा, मुंबईचा गिरणी कामगार, बंगालची हाक, रवि आला लावुनि तुरा, दुनियेची दौलत सारी, शिवारी चला, माझी मैना गावावर राहिली, जग बदल घालुनी घाव, मुंबईची लावणी इ. पोवाडे व लावण्या. इनामदार नाटक, अकलेची गोष्ट, शेटजीचे इलेक्शन, माझी मुंबई अर्थात मुंबई कोणाची? दुष्काळात तेरावा, पुढारी मिळाला इ. लोकनाट्ये. माझा रशियाचा प्रवास हे प्रवासवर्णन. बरबाद्या कंजारी, सापळा, रक्ताचा टिळा, बिलवरी, कोंबडी चोर, थडग्यातील माणसं, रामोशी, विष्णूपंत कुळकर्णी, उपकाराची फेड, डोळे, भूताचा मळा, स्मशानातील सोनं, प्रायश्चित्त, मकुल मुलाणी, अमृत, जोगीण, लाडी, तमासगीर, काडीमोड इ. कथा. चित्रा, माकडीचा माळ, संघर्ष, फकिरा, वैजयंता इ. कादंबऱ्या अशी त्यांची विपुल साहित्यसंपदा आहे.

अण्णा भाऊंच्या साहित्यातली माणसे आत्यंतिक गरीब, अज्ञानी, उपेक्षित अशी गाव कुसाबाहेरची आहेत. ज्या समाजव्यवस्थेत ती जगत आली; त्या समाज व्यवस्थेने त्यांना पावलो-पावली अपमानित केले. आत्मसन्मान, भूक या गोष्टींसाठी ते झगडताना दिसतात. मराठीमध्ये श्री. म. माटे यांनी 'उपेक्षितांचे अंतरंग' जाणले. परंतु माटे स्वतः उपेक्षित समाजातील नव्हते. दलितांविषयी, उपेक्षितांविषयी त्यांच्या मनात कणव होती, सहानुभूती होती. परंतु अण्णा भाऊ स्वतः उपेक्षित अशा मांग जातीत जन्मले होते. म्हणून आपल्या समाजाची वेदना ते प्रभावीपणे चितारू शकले.

समाजव्यवस्थेने निर्मिलेल्या आर्थिक आणि सामाजिक विषमतेविरुद्ध त्यांच्या पात्रांचा अहर्निश संघर्ष दिसतो. स्मशानातील सोनं, कोंबडीचोर, थडग्यातील माणसं, बरबाद्या कंजारी, रामोशी, यांसारख्या कथांतून दलितांच्या वेदना, व्यथा व्यक्त होताना दिसतात. अण्णा भाऊ समाजातील अत्यंत खालच्या थरातून आले होते. या समाजाच्या समस्या, वेदना त्यांना स्वानुभवाने परिचित होत्या. त्या वेदना पचवून त्यांनी आपले साहित्य निर्माण केले. त्यांचे आयुष्य अवघे ४९ वर्षांचे होते. एवढ्या कमी आयुष्यात त्यांनी विपुल साहित्यनिर्मिती केली. अण्णा भाऊंच्या कथेतील पात्रांची जगण्याची इच्छा जबरदस्त आहे. त्यांना कोणत्याही परिस्थितीत जगायचं आहे. ती जगायला कंटाळलेली नाहीत. परिस्थितीवर स्वार होऊन जगणारी माणसं त्यांनी आपल्या कथात्म साहित्यातून चितारली आहेत. या पात्रांना प्रत्येक क्षणाला लढावे लागते, झगडावे लागते. हे झगडणे मानवतेच्या स्थापनेसाठीच आहे. माणसांवर कोणीही कुठल्याही प्रकारचा अन्याय करू नये.त्याला माणसासारखं जगण्याच्या संधी द्याव्यात, म्हणून ही पात्रे लढताना दिसतात.

अण्णा भाऊ साठे यांची 'स्मशानातील सोनं' ही एक वैशिष्ट्यपूर्ण कथा आहे. जगण्यासाठी टोकाचा संघर्ष या कथेतून चित्रित झाला आहे. या कथेतील प्रमुख व्यक्तिरेखा भिमाची आहे. या भिमाला जगण्याचा नवा मार्ग सापडतो. प्रेतांच्या राखेत सोने असते याचा शोध भिमाला लागतो आणि रात्रंदिवस स्मशान धुंडाळीत राहतो. पुरलेली प्रेते बाहेर काढून त्यांच्या अंगावरील सोनं तो ओरबाडून काढतो. कारण "मुंबई चाळून मला काम मिळालं नाही, पण मढ्याची राख चाळून सोनं मिळालं" या सत्याचा त्याला शोध लागतो. या कथेतील भिमा दगडाच्या खाणीत दगड फोडण्याचे काम करतो. त्यातून मिळणाऱ्या अल्प मजूरीत तो आपला उदरनिर्वाह करतो. कठोर परिश्रम करूनही त्याला पोटभर अन्न मिळत नाही. त्यातच भर म्हणून खाणीचे काम बंद पडते. त्यामुळे त्याचे उपजीविकेचे साधनच गेल्यामुळे स्मशानात जाऊन मेलेल्या माणसांच्या अंगावरील सोने धुंडाळत राहतो. रात्रीच्या वेळी कोल्ह्या-कुत्र्यांशी झुंज देतो. मात्र त्याची बोटे प्रेताच्या तोंडात अडकतात व तुटतात. पुढे खाणीचे काम सुरू होते. पण बोटे तुटल्यामुळे तो पुरता उद्ध्वस्त होतो. या संदर्भात डॉ. भालचंद्र फडके लिहितात, "उद्याच्या अन्नासाठी, मढ्यासाठी आपली सर्व शक्ती पणाला लावून कोल्ही आणि भिमा

एकमेकांवरोबर झुंजत होते. पशू आणि मानव यांचे मृतदेहासाठी केवढे दारुण युद्ध! कोल्ह्यांना पराभूत करणाऱ्या भिमाची दोन बोटे प्रेताच्या दातांत अडकावी हाही केवढा दैवदुर्विलास! प्रेताच्या दातात अडकलेल्या बोटांना बाहेर काढण्यासाठी भिमा प्रेतावर प्रहार करू लागतो आणि ओरडतो, "भडव्या, सोड मला!" स्मशानातील सोन्यासाठी डोंगर फोडणारी बोटे भिमाला गमवावी लागतात, तेव्हा आपण अतिशय खिन्न होतो. खरंच ही भूक नसती तर जगण्यात काही अर्थ आला असता का? अन्नक्षुधा आणि कामक्षुधा या दोन्हीही शुधाच. या दोन्ही क्षुधांच्या तृप्तीसाठी माणसाला पशू व्हावे लागते."

पोट भरण्यासाठी माणसाने केलेल्या संघर्षाचे चित्रण अण्णा भाऊ अतिशय सामर्थ्याने करतात. बोटे तुटली म्हणून भिमा आक्रोश करीत नाही. तर 'आता मी उद्या कसा जगणार? या चिंतेने तो उद्ध्वस्त होतो. माणसाची 'भूक' हा अण्णा भाऊंच्या कथासाहित्याचा विषय वारंवार होताना दिसतो. स्वातंत्र्योत्तर काळातही माणसाच्या भूकेचा प्रश्न पुरता सुटलेला नाही. त्याला आजही अन्नासाठी वेगवेगळ्या पातळ्यांवर संघर्ष करावा लागतो. वेळ प्रसंगी चोरी करावी लागते. चोरी पकडल्यामुळे शिक्षाही होते, शिक्षा भोगून आल्यावर उदरनिर्वाहासाठी पुन्हा चोरीचा मार्ग स्वीकारावा लागतो. 'कोंबडीचोर' ही कथा या संदर्भात उल्लेखनीय आहे. कोंबडी चोरून जगण्याचा प्रयत्न करणारा रामू भिमाच्याच जातीचा आहे तो म्हणतो, "मला घर नाही, शेत नाही, अन्न पुढे आणि मी त्याच्या मागे धावतो आहे. तर चोरी नको करू तर काय करू?" 'कोंबडीचोर' मधील रामूचे दुःख हे आहे की, स्वातंत्र्य मिळून काहीच उपयोग झाला नाही. या संदर्भात डॉ. बजरंग कोरडे म्हणतात, "गरिबीच एखाद्या व्यक्तीला चोरी करायला भाग पाडते. गरिबी आणि भूक नाहीशी केल्याशिवाय चोरी आणि तत्सम गुन्हे थांबणार नाहीत. स्वतंत्र भारताचे सरकार भूक आणि गरिबी कमी करेल असे वाटले होते. परंतु जनतेचा भ्रमनिरास झाला." माणसाला दोन वेळचे जेवण सुखासुखी मिळत नसेल तर हे स्वातंत्र्य काय कामाचे? म्हणून तर कवी नामदेव ढसाळ व्यवस्थेला प्रश्न करतात. "स्वातंत्र्य कंच्या गाढवीचं नाव?" कोंबडीचोर रामूचे दुःख आहे की, हे स्वातंत्र्य माझ्यात काडीचाही बदल करू शकत नाही. मग मला काय करायचं आहे? आणि तो पुढे म्हणतो "तुमचं सरकार चोर पकडून तुरूंगात घालतं आणि सोडून देतं. पण चोरी का करावी लागते ह्याचा कधी विचार करीत नाही." अण्णा भाऊ साठे केवळ रामूची वेदना बोलकी करत नाहीत; तर स्वातंत्र्यात उपाशी राहिलेल्या सामान्य जनतेच्या दुःखाला वाचा फोडीत आहेत.

साठोत्तरी काळात दलित साहित्याचा प्रवाह ठळक होऊ लागला तेव्हा अण्णा भाऊंच्या लेखनाचा भर ओसरू लागला होता. अण्णा भाऊंचे निधन १८ जुलै १९६९ मध्ये झाले त्या दशकात बाबुराव बागूल दलित लेखकांचे प्रेरणास्थान होते. या दशकात अण्णा भाऊ आंबेडकरी चळवळीच्या जवळ येत होते. त्यांच्या लेखनावर मार्क्सवादाप्रमाणेच आंबेडकरवादाचाही प्रभाव होता.

तळागाळातल्या पददलित, भटक्या विमुक्त, गुन्हेगार जमातीतील माणसांच्या कथा त्यांनी लिहिल्या, त्यांची कथा श्रमिकांशी जसे नाते सांगते; तसेच दलित जीवनाशीही नाते सांगते. १९५८ मध्ये पहिले दलित साहित्य संमेलन मुंबईत झाले त्याचे उद्घाटक अण्णा भाऊ साठेच होते. त्या वेळी त्यांनी आपल्या भाषणात दोन महत्त्वाचे विचार मांडले "पृथ्वी शेषाच्या मस्तकावर नव्हे; तर दलितांच्या तळहातावर तरली आहे." याचा अर्थ समाजजीवनातील श्रमिकांचे, दलितांचे महत्त्व अण्णा भाऊंनी अधोरेखित केले आहे. दुसरा विचार असा मांडला की, "युगायुगाचे समज एका क्षणात नष्ट होत नसतात. म्हणून आम्ही दलित साहित्यिकांनी दलितांना वास्तव जगाच्या सर्व जुलमातून मुक्त केले पाहिजे."

दलित साहित्याचे एक प्रयोजन या आवाहनात आहे. अण्णा भाऊ लिहित होते तेव्हा दलित साहित्य ही संकल्पना अस्तित्वात येऊ पाहत होती. अण्णा भाऊंनी १९४५ च्या, सुमारास कथालेखनाला प्रारंभ केला त्यांचा 'खुळंवाडी' हा पहिला कथासंग्रह आहे. तो १९५७ मध्ये प्रसिद्ध झाला. त्यानंतर 'बरबाद्या कंजारी' १९६० मध्ये आला. 'ठासलेल्या बंदुका' हा कथासंग्रह १९७२ मध्ये प्रकाशित झाला. त्या काळात मराठी साहित्यात ग्रामीण व प्रादेशिक कथांचा एक प्रवाह उदयाला आला होता. स्थूलमानाने त्याच साच्यातून अण्णा भाऊंनी दलित जाणिवा आणि दलित अनुभव व्यक्त करण्याचा प्रयत्न केला. ग्रामीण आणि दलित याचे एक विलक्षण रसायन त्यांच्या कथेत आढळते. अण्णा भाऊंच्या कथेत दलित जीवनातील संघर्ष आहे पण वर्णव्यवस्थेविरुद्धचा आक्रोश तेवढा प्रभावीपणे जाणवत नाही.

अण्णा भाऊंनी डॉ. आंबेडकरांच्या विचारांची पेरणी आपल्या काही कथांमधून करण्याचा प्रयत्न केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांना जगण्याचे नवे तत्त्वज्ञान दिले, नवे आत्मभान दिले, त्यांच्यात जागृती घडविली आणि दलितांनी विशेषतः महारांनी घाणेरडी कामे करण्यास नकार दिला. मेलेली जनावरे उचलण्याचे काम दलितांनी सोडल्यामुळे सवर्ण विरुद्ध दलित असा संघर्ष निर्माण झाला हाच संघर्ष अण्णा भाऊंनी 'सापळा' या कथेत चित्रित केला आहे. या कथेतील हरिबा संपूर्ण गावाबरोबर संघर्ष पुकारतो. पारंपरिक कामे करण्यास नकार देतो. त्याचप्रमाणे 'वळण' या कथेतील दलित लोक मेलेल्या जनावरांचे मांस खाणे बंद करतात. समाजातील जे जे कुरूप आहे ते ते नाकारण्याचे काम अण्णा भाऊंची पात्रे करताना आढळतात. माणसाला माणसाने माणसासारखे जीवन प्रदान करायला हवे यालाच मानवतावाद म्हणतात. असा 'मानवतावाद' अण्णा भाऊंच्या कथात्म साहित्यातून ठायी ठायी प्रकट होताना दिसतो.

'उपकाराची फेड' या कथेत दलित जातीमध्येही श्रेणीरचना मानली जाते; यावर बोट ठेवले आहे. या देशात 'माणूस तुच्छ जात श्रेष्ठ' अशी परिस्थिती आहे. या कथेतील चांभार महार-मांगांना

तुच्छ लेखतो. तो महारा-मागांच्या चपला शिवत नाही. या कथेतील मळू महार हा या गोष्टीविरुद्ध आवाज उठवितो. मेलेली जनावरे ओढण्याचे काम नाकारतो. त्याप्रमाणे हिंदू धर्मातील रूढी-परंपरेने लादलेली बंधनेही झुगारून देण्याचे काम अण्णा भाऊंची पात्रे करतात. माणसाने सर्वांना मानवतेच्या दृष्टीने स्वीकारले पाहिजे असा संदेश अण्णा भाऊंच्या बहुतांशी कथा देताना आढळतात. भूकेने खंगलेली, पोटासाठी गावकऱ्यांच्या उष्ट्या अन्नासाठी अंगणात ताटकळत बसलेली महार-मांगांची माणसं भेटतात. या कथेतील रायनाक हा गावावरील आलेल्या संकटाला सामोरा जातो. गावावर अनंत उपकार करून मरतो. त्याच्या नावाचा भंडारा घातला जातो परंतु रायनाकच्या वारसांना भंडाऱ्यात प्रसादही मिळत नाही. या कथेतून अण्णा भाऊंनी गावगाड्यामध्ये दलितांवर होणाऱ्या अन्यायाचे, शोषणाचे चित्र उभे केले आहे.

'विष्णूपंत कुळकर्णी' ही कथाही प्रत्ययकारी आहे. या कथेतील विष्णूपंत महारा-मांगांना सांगतात, "कसंही करून जगा, पण तुम्ही कुत्र्यासारखं मरू नका. उकीरड्याचा पांग फिटतो. तुम्ही तर माणसं आहात." या कथेतील मुरा मठकऱ्याचा वाडा लुटतो व गुन्हेगार म्हणून अटकेत जातो. माणूस भूकेसाठी कुठल्याही थराला जाऊ शकतो याचे चित्रण अण्णा भाऊ या कथेतून करतात. भूकेसाठी माणसाला घाणेरडी कामे करावी लागतात, चोऱ्या कराव्या लागतात, लुटालुट करावी लागते हे अण्णा भाऊंनी अनेक कथांमधून सांगण्याचा प्रयत्न केला आहे. हे मानवतेला धरून निश्चितच नाही. भारतीय संस्कृती श्रेष्ठ आहे, पवित्र आहे असे म्हटले जाते, परंतु अण्णा भाऊ या मताशी सहमत दिसत नाही. कारण या देशात माणसाला जातीमुळे, गरिबीमुळे पावलो-पावली विटंबित केले जाते. माणसासारख्या माणसाला पशूपेक्षाही हीन पातळीवर जीवन जगावे लागते हे सर्व मानवतेच्या विसंगत आहे. हेच अण्णा भाऊंनी आपल्या कथांमधून सूचित करण्याचा प्रयत्न यशस्वीपणे केला आहे.

'बरबाद्या कंजारी' ही अण्णा भाऊंची कथा वैशिष्ट्यपूर्ण आहे. या कथेतून त्यांनी जात पंचायत, अनिष्ट प्रथा, परंपरा याविरुद्ध आवाज उठविला आहे. बरबाद्या कंजारी जात पंचायतीचा निर्णय झुगारतो. जात पंचायतीचे अनिष्ट नियम माणसाची माती करतात. मानवतेच्या विरोधी जातात. 'माणूस महान आहे' हे अण्णा भाऊंच्या कथांचे सूत्र आहे. अनिष्ट प्रथा, परंपरा, रूढी यांनी मानवतेला काळीमा फासण्याचेच काम केले आहे. 'बरबाद्या कंजारी' या कथेच्या प्रस्तावनेत अण्णा भाऊ लिहितात, "माझी जीवनावर फार निष्ठा असून मला माणसं फार आवडतात. त्यांची श्रमशक्ती महान आहे. ती जगतात, जगाला जगवतात. त्यांच्या बळावरच हे जग चालतं. त्यांना विद्रूप करणं मला आवडत नाही. नव्हे मला भिती वाटते. या माणसांना वैफल्याच्या नावाखाली विद्रूप करू नये. वैफल्य हे तलवारीच्या धुळीसारखं असते नि ती धूळ झटकून तलवार लखलखती करता येते." ही त्यांची भूमिका होती. म्हणजे माणसाला वेगवेगळ्या कारणांनी विद्रूप करण्यापेक्षा त्याला 'माणूस' म्हणून जगू द्या त्याच्या आत्मप्रतिष्ठेला ठेच

लागेल असे जगणे, त्याला जगायला भाग पाडू नका. म्हणजेच मानवतेच्या भावनेने त्याचे जीवन सुंदर कसे होईल हे पहा. हाच संदेश अण्णा भाऊंचे कथावाङ्मय वारंवार देताना आढळते.

अण्णा भाऊ साठे यांनी मार्क्सवादी दृष्टिकोनातून अनेक कथा लिहिल्या आहेत. अन्नान्न दशा व संघर्ष दाखविणारी 'मुकुल मुलाणी' ही कथा. मालकाचा जाच, अन्याय, शिव्या सहन करून पोटासाठी लाचार झालेला 'शिकार' कथेतील गंगाराम. कोंबड्या चोरून जगणारा 'कोंबडीचोर' कथेतील रामू. 'भूकेने व्याकुळ होऊन उष्टे अन्न मागणारी महार-मांगांची माणसं', 'थडग्यातील हाडं' या कथेत भेटतात. यांसारख्या कथांमधून अस्पृश्यतेसारख्या सामाजिक प्रश्नांपेक्षा आर्थिक विषमतेमुळे आलेले दाहक अनुभव अधिक प्रभावीपणे व्यक्त झालेले दिसतात. या कथा दैन्य, दारिद्र्य, अपमान यांनी मोडून काढलेल्या 'भूके' च्या निदर्शक आहेत.

अण्णा भाऊ हे मार्क्सवादी विचारांचे होते हे खरे, पण त्यांनी आपल्या कथेतून दलित माणसाचे सामाजिक मनच व्यक्त केले आहे. समाजव्यवस्थेने नाकारलेल्या वंचित माणसांबद्दल त्यांच्या मनात अपार करुणा आहे. त्यांच्या माणसांची सृष्टी त्यांची आपलीही होती. ते एके ठिकाणी लिहितात, "प्रतिभेला वास्तवाची गरज असते, कल्पनेलाही जीवनाचे पंख असणे आवश्यक असते. अनुभूतीला सहानुभूतीची जोड नसेल तर आपण का लिहितो याचा पत्ताच लागत नाही. ज्यांच्याविषयी मी लिहितो ती माझी माणसं असतात." अशा प्रकारे अण्णा भाऊंचे कथावाङ्मय उपेक्षित, वंचित, पीडित, शोषित जगातील माणसांचे प्रत्ययकारी चित्रण करते.

अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या कथावाङ्मयातून 'स्त्री' जीवनालाही वेगळ्याच दृष्टीने स्पर्श केलेला दिसतो. स्त्रियांच्या वाट्याला त्या केवळ 'स्त्री' असल्यामुळे अनेक दुःखांना सामोरे जावे लागते. 'डोळे' या कथेतील गीता, 'बिलवरी' या कथेतील बिलवरी, 'मानकी' या कथेतील मानकी, 'रम्मी' या कथेतील रम्मी या स्त्रियांचे भावविश्व वेगळेच आहे. त्यांनी जे जगणे स्वीकारले आहे ते समाज-व्यवस्थेने त्यांच्यावर लादलेले आहे. त्यांना 'माणूस' म्हणून व्यवस्थेने स्वीकारले नाही म्हणून त्यांच्या जीवनांची वाताहत झालेली आहे.

अण्णा भाऊंनी आपल्या कथावाङ्मयातून अनेक विषय हाताळले आहेत. डॉ. प्रकाश खरात यांच्या मते, "अण्णा भाऊंची कथा मराठीत आपले निराळे अनुभवविश्व घेऊन प्रकट झाली आहे. विविध प्रवृत्तींच्या नायिका, विविध जीवन संघर्षातील नायक, विविध विषयांतील जाणिवा आणि प्रस्थापित तत्त्वज्ञानापेक्षा वेगळे तत्त्वज्ञान, यामुळे त्यांच्या कथेचे स्वरूप स्वतंत्र आहे. मनोरंजन साधूनही दारिद्र्यात व सामाजिक दास्यात जगणाऱ्या माणसांचे सत्य सांगण्यात ते यशस्वी झाले आहेत." अण्णा भाऊंच्या कथांचे विषय विविधांगी असले तरी त्यांची सर्व पात्रे मानवतेच्या प्रस्थापनेसाठी झगडताना दिसतात. कोणत्याही माणसाला मग तो पुरुष असेल किंवा स्त्री प्रत्येकाला सन्मानाने जगण्याचा

अधिकार भारतीय संविधानाने दिलेला आहे. त्याला तसे निर्धोकपणे जगता आले पाहिजे. हा मानवतावादी विचार अण्णा भाऊंच्या प्रत्येक कथेतून प्रतिबिंबित होताना दिसतो.

अण्णा भाऊंच्या साहित्यावर विविध विचारवंतांनी जी भाष्ये केलेली आहेत ती उल्लेखनीय आहेत. थोर साहित्यिक प्र.के. अत्रे लिहितात, "माणसाने जगलं पाहिजे असा संदेश देणारी अण्णा भाऊंची अस्सल मराठी बाण्याची कथा मराठी वाचकांना नुसता आनंदच देऊन थांबणार नाही; तर त्यांच्या अंगी लढाऊ जोम निर्माण करील, त्यांच्या रक्ताला बंडाची प्रेरणा देईल ह्यात तीळमात्र शंका नाही."

समीक्षक गो.वि. करंदीकर लिहितात, "त्यांचे उभे आयुष्य म्हणजे साम्यवादाने झपाटलेली एक जळती चूड होती. वाङ्मय म्हणजे त्या चुडीतून उडालेल्या काही ठिणग्या. काही पेटविणाऱ्या, काही डागणाऱ्या, काही झोंबणाऱ्या, काही झोंबता-झोंबता हसविणाऱ्या."

समीक्षक रा.ग. जाधव म्हणतात, "अण्णा भाऊंनी जे दलित जीवन अनुभवले, पाहिले त्या दलित जीवनाला मानव्याचा आणि कलेचा घाट देण्यात श्रमराज्याच्या नव्या धर्मानेच त्यांना साथ दिली. या धर्माने माणूस म्हणून असलेला त्यांचा अधिकारच केवळ मान्य केला असे नाही, तर त्यांचा कलावंत म्हणून असलेला हक्कही संमत केला."

थोर समीक्षक डॉ. भालचंद्र फडके म्हणतात, "अण्णा भाऊंच्या कथांतील माणसे ही वास्तवातली. या सामान्य माणसांना अण्णा भाऊंनी साकार केले. त्यांना कोणी विचारले असते की, माणूस कसा हवा? तर ते म्हणाले असते माणूस दुःखाचे डोंगर फोडणारा जिद्दीचा हवा. त्यांच्या अंतःकरणात बंडखोरी वसत होती तीच बंडखोरी त्यांच्या कथातील माणसांत आहे."

त्यांच्या कथा वाङ्मयातील जी बंडखोरी आढळते ती मानवतेच्या प्रस्थापनेसाठीच आहे. हे सत्य आपल्याला नाकारता येणार नाही.

संदर्भ -

१) 'लोकशाहीर अण्णा भाऊ साठे निवडक वाङ्मय' - संपा. अर्जुन डांगळे

२) 'दलित साहित्य वेदना व विद्रोह' - डॉ. भालचंद्र फडके

३) 'अण्णा भाऊ साठे साहित्य समीक्षा' - संपा. प्रा. रणधीर शिंदे

४) 'दलित साहित्य उद्गम आणि विकास' - डॉ. योगेंद्र मेश्राम

५) 'दलित साहित्य चिकित्सा' - डॉ. सदा कऱ्हाडे

६) 'मराठी कथा : परंपरा आणि स्वरूप विशेष' - डॉ. सुभाष पुलावळे